# ई-निविदा सूचना

## अमरावती जिल्हयातील रेती घाटांचा लिलाव

## ई-निविदा/ई-लिलाव-सन २०२०-२०२१
## (वाळू/रेती निर्गती सुधारित धोरण २०१९ नुसार)

जाहीर सुचना देण्यांत येते की, **अमरावती जिल्हयातील ७ तालुक्यातील २३ रेतीघाटाचे ई-टेंडरींग / ई-ऑक्शन, राज्यस्तरीय पर्यावरण आघात निर्धारण समितीच्या मंजूरीने करण्यांत येत आहे.**

सन २०२०-२०२१ करिता दि. ०९/०६/२०२१ पर्यंतच्या मुदतीसाठी ई-निविदा निर्गती करणेसाठी https://amravatico.abcprocure.com या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आले आहेत. तसेच ई-लिलावाकरीता https://amravatico.abcprocure.com या वेबसाईटचा उपयोग करावा. सदर वेबसाईटची लींक जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावतीच्या amravati.nic.in या वेबसाईटवर देण्यात आलेली आहे. इच्छूक कंत्राटदारांना ई-निविदा व ई-लिलावात भाग घेणेसाठी विनंती करण्यात येत आहे.

रेती घाटाचे ई-टेंडरींग करते वेळी वाळुघाट निहाय प्राप्त ई-टेंडर व ई-लिलावाला नियमानुसार मंजुरी प्रदान करण्यांत येईल. त्या लिलावात उच्चतम बोली बोलणा-याचे नावे तो रेती घाट मंजूर करण्यात येईल. मात्र सदरच्या जाहीर लिलावास फक्त त्या त्या रेती गटाचा ई-टेंडर भरणा-यांनाच भाग घेता येईल, इतरांना भाग घेता येणार नाही. ई-लिलावात बोली न आल्यास ई-टेंडरच्या उच्चतम देकार स्वीकारण्यात येईल.

ई-निविदा व ई-लिलाव प्रक्रीयेत भाग घेण्याकरीता इच्छुक कंत्राटदाराना उपरोक्त वेबसाईटवर ऑनलाईन नाोंदणी करणे आवश्यक आहे. ऑनलाईन नोंदणी करीता डिजिटल सिग्नेचर सर्टीफीकेट अनिवार्य आहे. निविदेचा नमूना, प्रतिज्ञापत्र, रेती घाट यादी, अटी व शर्ती, ना-परतावा नोंदणी फी रु. ३६५८/-(जीसटीसह) व ना-परतावा रु.६९४७/-(जीएसटीसह) (१० लाखा पेक्षा कमी किमतीच्या रेती घाटा करीता रु. ३९४७/-(जीएसटीसह) टेंडर फी अधिक प्रोसेसिंग फी ऑन-लाईन जमा केल्यानंतर निविदाधारकाला संकेतस्थळावरुन ऑनलाईन ई-निविदा खरेदी करता येईल. रेती घाटा संबंधी ची विस्तृत माहिती उपरोक्त वेबसाईटवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, संबंधित उपविभागीय अधिकारी व तहसिल कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**ई -टेंडर व ई-लिलाव करणेसाठी वेळपत्रक खालील प्रमाणे आहे.**

| दिनांक | तपशील |
|---|---|
| १३.०२.२०२१ | सकाळी १०.०० वाजे पासून बिडर रजिस्टेशन ऑन-लाईन (संगणकीय नोंदणी) सुरु होईल. |
| १८.०२.२०२१ | सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत निविदाधारकाचे ऑनलाईन रजिस्टेशन करणे (संगणकीय नोंदणी) बंद होईल. |
| १५.०२.२०२१ | सकाळी १०.०० पासून निविदाधारकास ऑनलाईन ई-निविदा भरणे (संगणकीय नोंदणी) सुरु होईल. |
| २२.०२.२०२१ | सायंकाळी ५.०० वाजता ई-निविदा ऑनलाईन पध्तीने (संगणकीय) स्वीकारणे बंद होईल. EMD ची रक्कम दिनांक २२.०२.२०२० रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत जमा करणे अपेक्षीत आहे. त्यानंतर जमा केलेल्या EMD च्या रकमेबाबत विलंब झाल्यास त्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील. |
| २५.०२.२०२१ | ई-ऑक्शन (ई-लिलाव) खालील प्रमाणे करण्यात येईल.<br>पहिला टप्पा (तृतीय फेरी)गट (लॉट) क्रमांक-०१ ते ०७ (पृथक individual sand ghats) सकाळी ११.०० ते १२.०० वाजेपर्यंत.<br>दुसरा टप्पा (प्रथम फेरी) गट (लॉट) क्रमांक-०८ ते २३ (पृथक individual sand ghats) दुपारी ०१.०० ते ०२.०० वाजेपर्यंत. |

| | |
|---|---|
| | (वेळ समाप्तीचे वेळी बोली आल्यास संगणकीय प्रणाली व्दारे प्रत्येकी १० मीनीट प्रमाणे फक्त ३ (तिन) वेळा वाढ करण्यात येईल). लिलावाची बोली (Increment amount) कमीतकमी अपसेट प्राईजच्या १ टक्के (पूर्णांकात) वाढीव दराने असून अमर्यादित असेल. त्यानंतर ई-लिलाव बोली उघडण्यात येईल. |
| २५.०२.२०२१ | ऑनलाईन प्राप्त ई -निविदा दुपारी ४.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे डाऊनलोड करुन उघडण्यात येतील.ई-निविदा आणि ऑक्शन यामध्ये जे किमंत जास्त असले त्यास लिलाव मंजूर करण्यात येईल. |

टिप- गट (लॉट) निहाय रेतीघाटाची माहिती उपरोक्त संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**वाळु लिलावाकरीता बोलीदार/खरेदीदारांसाठी महत्वाची सूचना (२०२०-२०२१)**

- **डिजीटल सिग्नेचर प्रमाणपत्र वर्ग २ किंवा ३ साईनिंग +एनक्रिप्श्न नोंदणीच्या वेळी संलग्न करणे आवश्यक आहे**
- **बोलीधारकांना घाट निवडणे व त्यांना खरेदी कराची घाट्सची दर भरुन घ्यावी लागेल. त्यानंतर निवडलेल्या घाटासाठी सहभाग शुल्क, निविदा दस्तऐवज फी आणि ईमडी देण्यास सक्षम असतील**
- **कृपया लक्षा घ्या की, आरटीजीएस/एनईएफटी व्दारे रक्कम आपल्या बिडर आयडीमध्ये उपलब्ध करण्यासाठी एक दिवस अगोदर आगाऊ आवश्यक आहे. म्हणुनच कृपया खात्री करा की, आपण पेमेंट गेटवेवर आरटीजीएस/एनईएफटी पर्याव्दारे कागदपत्र शुल्क/ईमडी देयक भरण्याआधी किमान एक दिवस अगोदर निधी पाठवावयाचा आहे.**
- **एकदा बोलीदाता अंतिम सबमिशन पूर्ण केल्यानंतर , तो इतर घाटांना जोडण्यास किंवा बोली करण्यास सक्षम असणार नाही, म्हणुनच बोलीदाराने स्वत: ला त्याच्या बिडने स्वत:ची पुर्तता आणि ती फक्त ई-निवीदा मध्ये अंतिम सबमिशन चरण पूर्ण करेल.**

कार्यालयीन वेळ
सोमवार ते शुक्रवार सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० वाजता

**संपर्क तपशिल : नोंदणी प्रक्रियेशी संबंधित कोणत्याही प्रश्नासाठी ,डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र सत्यापन आणि प्रथम स्तरावरील मंजुरीसाठी कृपया खालील क्रमांकवर संपर्क साधा.**

| अनुक्रमांक | व्यक्तीचे नांव | संपर्क क्रमांक | मोबाईल नंबर | ईमेल आयडी |
|---|---|---|---|---|
| १ | सोनू टँक | ०७९ ३५०२२१८० | | Sonu@abcprocure.com |
| २ | सताब्दी डे | ०७९ ३५०२२१६७ | +९१६३५३२१७०८० | Satabdi@abcprocure.com |

ई-निवीदा आणि ई-लिलाव मध्ये बोली करतांना कोणत्याही तांत्रिक समर्थनासाठी , कृपया खाली क्रमांकवर कॉल करा.

ईनिवीदा आणि ई-लिलाव मध्ये बोली करतांना कोणत्याही तांत्रिक सर्मनासाठी, कृपया खाली क्रमांक वर कॉल करा.

| नांव | मोबाईल नंबर | ईमेल आयडी | सर्वांसाठी सामान्य ई-मेल आयडी |
|---|---|---|---|
| नंदन वालेरा | ९०८१०००४२७ | nandan.v@eptl.in | support@abcprocure.com |
| देवेंद्र राजपुरोहित | ९५१०८१२९७१ | devendra.r@eptl.in | |
| निखिल खलास | ९३४५५१९७२९ | nikhil@eptl.in | |
| ई-पेमेंट संबंधित समर्थनासाठी, payment@eptl.in वर मेल करा आणि उपरोक्त क्रमांकावर संपर्क साधा. | | | |

**अपर जिल्हाधिकारी, अमरावती**

# <u>प्रेस नोट</u>

## <u>अमरावती जिल्हयातील रेती स्थळांचे ई-निविदा-ई-लिलाव सन २०२०-२०२१</u>

सन २०२०-२०२१ (०९/०६/२०२१ अखेर पर्यंत) वर्षाकरिता अमरावती जिल्हयातील ७ तालुक्यातील २३ रेती स्थळांचे लिलाव प्रक्रिया ई-निविदा-ई-लिलाव ऑनलाईन प्रणालीव्दारे दि.१३.०२.२०२१ पासुन होत आहे. ई-निविदा-ई-लिलाव बाबतचा संपूर्ण तपशील हा https://amravatico.abcprocure.com या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येणार आहे . रेतीघाटा संबंधी ची विस्तृत माहिती उपरोक्त वेबसाईटवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय अधिकारी, कार्यालय, तहसिल कार्यालयात व amravati.nic.in वेबसाईट वर उपलब्ध राहील. ई-निविदा-ई-लिलाव मध्ये भाग घेण्यापूर्वी सदर प्रक्रीयेत **<u>भाग घेणा-यांना नव्याने नोंदणी करणे तसेच डिजीटल सर्टीफिकेट काढणे आवश्यक आहे.</u>** ई-निविदाधारक तसेच लिलावधारकाकडे पॅन कार्ड, जीएसटी रेजीस्ट्रेशन, (जीएसटीएन कार्ड) असने आवश्यक आहे. त्या शिवाय त्यांना रेती ई-निविदा प्रक्रीयेत भाग घेता येणार नाही. रेती लिलावाच्या ई-निवेदा-ई-लिलाव प्रक्रीयेत सर्व संबंधितानी भाग घ्यावा असे आवाहन अपर जिल्हाधिकारी, अमरावती यांनी केले आहे.

**अपर जिल्हाधिकारी, अमरावती**

# पहिल्या टप्प्यातील रेती घाट लिलाव सन 2020-2021 (तृतीय फेरी)

| लॉट क्र. | रेतीघाटाचे नांव | तालुका | नदी/ नाल्याचे नांव | स्थळदर्शक/लगतचे सर्वे /गट क्रमांक | लांबी (मी.) | रुंदी (मी.) | प्रस्तवित केलेला रेतीचा थर (मी.) | रेतीघाटा चे एकूण क्षेत्रफळ (चौ.मी.) | अंदाजीत रेतीसाठा (ब्रास) | रेतीघाटाची किंमत (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | चाकूर | भातकुली | पेढी | 1, 11 ते 14, 144, 147 | 800 | 20 | 0.50 | 16000 | 2827 | 7204000 |
| 2 | एलोरी मिर्झापूर | दर्यापूर | पूर्णा | 2, 3, 127, 140 | 900 | 12 | 0.50 | 10800 | 1908 | 4862100 |
| 3 | नांदेड बु. | दर्यापूर | पूर्णा | 33, 34, 37, 38, 43 | 800 | 15 | 0.50 | 12000 | 2120 | 5402400 |
| 4 | चंडिकापूर | दर्यापूर | पूर्णा | 125, 128, 129, 138 ते 140, 145, 147, 118, 119, 113, 114, 69 ते 71 | 1000 | 20 | 0.50 | 20000 | 3534 | 9005600 |
| 5 | टाकरखेडा | दर्यापूर | पूर्णा | 41, 42, 13, 14, 17, 16, 27, 28 ते 35 | 1000 | 15 | 0.50 | 15000 | 2650 | 6752900 |
| 6 | घुईखेडा | दर्यापूर | पूर्णा | 2 ते 15 | 800 | 15 | 0.50 | 12000 | 2120 | 5402400 |
| 7 | चांदुर ढोरे | तिवसा | वर्धा | 2 व 4 | 380 | 50 | 0.50 | 19000 | 3357 | 8554600 |

# दुसऱ्या टप्प्यातील रेती घाट लिलाव सन 2020-2021 (प्रथम फेरी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | गोकुळसरा | धामणगाव रेल्वे | वर्धा | ग.नं.1ते 3, 8 ते 11 | 800 | 60 | 1.00 | 48000 | 16961 | 43202000 |
| 9 | देऊतवाडा 2 | वरुड | वर्धा | 139 ते 144 व 146 ते 150 | 560 | 18 | 0.50 | 10080 | 1781 | 4538500 |
| 10 | रत्नापूर (सेंधवाल घाट) | धारणी | तापी | 14,16,10,36,37 | 314 | 34 | 0.50 | 10676 | 1886 | 4806100 |
| 11 | धुळघाट (काट्याघाट) | धारणी | गडगा | 114,115 | 501 | 20 | 0.50 | 10020 | 1770 | 4510500 |
| 12 | चिंचघाट (झिरण्याघाट) | धारणी | तापी | 23, 26 ते 29, 52 | 362 | 28 | 0.50 | 10136 | 1791 | 4564000 |
| 13 | घडा | दर्यापूर | चंद्रभागा | 2 ते 5, 174, 175,176 | 1600 | 13 | 0.80 | 20800 | 5880 | 14978800 |
| 14 | म्हैसपूर मोचर्डा | दर्यापूर | चंद्रभागा | 5,12,16, 36,413,14,37,38 | 1400 | 15 | 0.80 | 21000 | 5936 | 15121500 |
| 15 | खानपूर चिपर्डा | दर्यापूर | चंद्रभागा | 1 ते 6, 160 ते 161, 150 ते 151,152 ते 156 | 1600 | 13 | 0.70 | 20800 | 5145 | 13107500 |
| 16 | चांडोळा | दर्यापूर | पूर्णा | 214, 226, 216, 13 ते 15, 213,215 | 910 | 22 | 0.70 | 20020 | 4952 | 12615800 |
| 17 | करतखेड | दर्यापूर | पूर्णा | 3 ते 5, 38, 39, 50 ते 52, 54, 6,7,40,48,49,16,15,17,18,19 | 865 | 25 | 0.70 | 21625 | 5349 | 13627300 |
| 18 | लासूर | दर्यापूर | पूर्णा | 279, 274, 276, 272, 273; 265, 266,267, 261, 248,258,280 ते 287 | 750 | 30 | 0.50 | 22500 | 3975 | 10129400 |
| 19 | वडूरा | दर्यापूर | पूर्णा | 1, 314, 315,316,318,312 | 1150 | 18 | 0.50 | 20700 | 3657 | 9319100 |
| 20 | बेंबळा खु. | दर्यापूर | चंद्रभागा | 1 , 8,2,38 | 1040 | 20 | 0.50 | 20800 | 3675 | 9364900 |
| 21 | शिवरा भाग 1 | मोर्शी | वर्धा | 29 | 325 | 35 | 0.50 | 11375 | 2010 | 5122100 |
| 22 | शिवरा भाग 2 | मोर्शी | वर्धा | 1 | 305 | 35 | 0.50 | 10675 | 1886 | 4806100 |
| 23 | निंभार्णी | मोर्शी | वर्धा | 1 | 310 | 35 | 0.50 | 10850 | 1917 | 4885100 |

अपर जिल्हाधिकारी, अमरावती

# जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती.

## सन २०२०-२१ वर्षाकरिता

## रेती / वाळू उत्खनना च्या प्राप्तीसाठी ई- निविदा/ ई-लिलाव

## प्रपत्र अर्जाचा नमुना

| अर्जदाराचा पासपोर्ट फोटो |
|---|

**ई- निविदा क्रमांक-** ई- निविदा अर्जाची किंमत रु. ५०००/- (ना-परतावा)
(रु.दहा लक्ष किंवा त्यापेक्षा कमी किमतीचे रेतीघाटाकरीता
ई-निविदा अर्जाची किंमत रु. २०००/-)

१. रेती गटाचे/घाटाचे नांव/गांव (यादीनुसार) :-----------------------------------------------

२. रेती घाटा चे आय डी क्रमांक (यादीनुसार) :-----------------------------------------------

३. रेती घाट कोणत्या तहसिलचा आहे :-----------------------------------------------

४. नदी अथवा नाल्याचे नाांव (उपलब्ध असल्यास):-----------------------------------------------

रेती घाटाची आराजी (यादीनुसार) :-----------------------------------------------

५. रेती घाटाची गट क्र / ख.क. इत्यादी :-----------------------------------------------

(उपलब्ध असल्यास) यादीप्रमाणे : -----------------------------------------------

६. रेती घाटाची सरकारी किमान किंमत (अपसेट प्राईज) रु. :-----------------------------------

७. अर्जदाराने ज्या किंमतीत रेती घाट अ) अंकात रुपये :-----------------------------------

घेण्याचे ठरविले आहे ती किंमत ब) अक्षरी रुपये :-----------------------------------

८. अपसेट किंमती च्या २५% ऐवढी इसारा रक्कम रु. :-----------------------------------

९. २५% रक्कमे चा आरटीजीएस क्रमांक व दिनांक :-----------------------------------

१०. आरटीजीएस कोणत्या बॅकेतून काढण्यात आले आहे :-----------------------------------

११. आरटीजीएस काढण्यात आलेल्या बॅके ची शाखा :-----------------------------------

१२. अर्जदारा चे/ कंपनी चे/फर्म. चे पूर्ण नांव :-----------------------------------

कंपनी/फर्म रजिस्टेशन सर्टिफिकेट जोडावे. :-----------------------------------

..२

१३. अर्जदाराचा पोष्टाचा पूर्ण पत्ता पिन कोड सह :-------------------------------------------

१४. अर्जदाराचा दुरध्वनी क्रमांक व मोबाईल क्र.:-------------------------------------------

१५. अर्जदारा चा हल्लीचा व्यवसाय :--------------------------------------------------------

१६. आयकर भरत असल्याचा पुरावा, पॅन क्रमांक व वस्तू व सेवाकर विभागाचा, जीएसटिन (GSTIN) क्रमांकाची प्रत, शपथ पत्र आणि कंपनी/ फर्म असल्यास रजिस्टेशन प्रत जोडावे.

दिनांक: / /२०२० **अर्जदाराचे नांव व स्वाक्षरी**

**सहपत्र-**

१) टेंडर फी रु. ५०००/- भरणा केल्याबाबत ईटीजीएस पुरावा

२) अपसेट किमतीचे २५ % रक्कमे चा आरटीजीएस पुरावा

३) पॅन कार्ड छायांकित प्रत

४) जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र

५) मागिल २ वर्षाचे आयकर रिटर्नची छायांकित प्रत

६) टिन (TIN) क्रमांक प्रमाण पत्र

७) कंपनी/ फर्म असल्यास रजिस्टेशन प्रत

८) १००/- स्टॅम्प पेपर वर शपथ पत्र (ॲफेडेव्हीट/नोटरी)

# शपथपत्र

(ई टेंडरींग निविदा धारकाकडून लिलावाची १/४ रक्कम भरुन घेतल्यानंतर भरावयाचे)

मी,------------------------------------------------ (पूर्ण नांव) रा.---------------------- ता.---------------------जि.------------------ रेती घाट लिलाव घेणार शपथेवर लिहुल देतो की, मी मौजा -----------------ता.---------------जि. अमरावती, येथील सर्व्हे नं./ग.क्र.------------------ -----------क्षेत्र--------- हे.आ./चौ.मी. या रेतीघाटाचा सा २०२०-२१ या वर्षाकरीता (०९.०६.२०२१ पर्यंत) रु.--------------- (अक्षरी रु.---------------------------------------------------------) किंमतीस लिलाव घेतलेला आहे. सदर रेती घाट अपर जिल्हाधिकारी/जिल्हाधिकारी अमरावती यांनी मंजूर केल्यास करारनाम्याच्या तारखेपासून दिनांक ०९.०६.२०२१ पर्यंत (किंवा अपर जिल्हाधिकारी/ जिल्हाधिकारी अमरावती यांचेकडुन परवाना रद्द होईपर्यंत या पैकी जे अगोदर होईल.) मंजूर रेती साठयाचे उत्खनन व वाहतूक करण्यात येईल.

उक्त रेतीघाटाची ई-निवीदा भरण्यापूर्वी सदर रेती घाटाची मी, मोक्यावर जाऊन पाहणी केली असून रेती घाटाची स्थिती, रेती साठा व्यवस्थित दिसून आल्यावरच मी माझ्या मर्जी नुसार लिलाव घेतला आहे. भविष्यात नैसर्गिकरित्या अथवा अन्य कारणामूळे आणि डॅमचे तसेच तलावाचे पाण्यामूळे घाटाचे स्थितीत बिघाड होऊन किंवा शासकीय रस्ता उपलब्ध नसल्यामूळे/इतर कारणा मुळे रेती उत्खनन/वाहतूक करावयास अडचणी आल्यास शासना विरुध्द माझी कोणतीही तक्रार राहणार नाही व अशी स्थिती निर्माण झाल्यास रेतीघाटाच्या लिलावाची रक्कम मी परत मागणार नाही. रेतीघाट लिलावा बाबतच्या अटी व शर्ती मी स्वत: वाचल्या / वाचुन घेतल्या असुन त्यासाठी मी याव्दारे बंधनकारक आहे.

सदर रेतीघाटाचे ई-टेंडर/लिलावाच्या रक्कमेच्या १/४ रक्कम रु. --------------------- (अक्षरी रु.------------------------------------------------------------) आरटीजीएस / चलान क्र.---------------- दि.-------------नुसार शासकीय खजिन्यात/डि.डि.भरणा केली आहे. सदर रेतीघाटास अपर जिल्हाधिकारी अमरावती यांनी मंजूरी प्रदान केल्यानंतर अपर जिल्हाधिकारी अमरावती यांचे सर्वात जास्त ई-टेंडरीगच्या-ई-लिलावाच्या रक्मेनूसार मंजूर, आदेशानूसार माझ्या व्दारे ३/४ रकमेचा भरणा व अनामत रकम रु. ३,००,०००/- किंवा लिलावाच्या २० टक्के या पैकी जास्त असेल तेवढी रकम १५ दिवसाचे आंत शासन जमा करण्यात येईल. विहीत कालावधीत असे न केल्यास मी भरलेली लिलावाची रक्कम शासन जमा होऊन व सदर घाट माझ्या नावाने रद्द होऊन पुन्हा लिलाव घेतल्यास यात माझी काहिही हरकत राहणार नाही. सदर घाट हा पुन्हा लिलाव झाल्यास त्या घाटाचे लिलावाच्या फरकाची रक्कम किंवा लिलाव न झाल्यास यापुर्वी घेण्यात आलेल्या लिलावाची ३/४ रक्कमेचा भरणा करण्यास सहमत आहे. आणि असे जर न केल्यास जमिन महसूलाची थकबाकी म्हणून सदर रक्कम माझेकडून भरणा करण्यात येईल व माझे सदर रेती घाटावर कोणताही मालकी हक्क राहणार नाही याची मला जाणीव आहे. सदर नूकसान भरपाई बाबत शासना कडे कोणतीच फिर्याद करणार नाही, किंवा न्यायालयात धाव घेणार नाही. सदर रेतीघाटास अपर जिल्हाधिकारी अमरावती यांनी मंजूरी प्रदान केल्यानंतर अपर जिल्हाधिकारी अमरावती यांचे सर्वात जास्त ई-टेंडरीगच्या-ई-लिलावाच्या रक्मेनूसार मंजूर, आदेशानूसार माझ्या व्दारे जीएसटी च्या देय रकमेचा भरणा शासनाचे आदेशानुसार भरण्यास माझ्यावर बंधनकारक राहील.

रेती उत्खनना व वाहतूकी बाबतच्या सर्व अटी/शर्थीचे मी पूर्णत: पालन करीन याचे उल्लंघन केल्यास मी दंडनिय कार्यवाईस पात्र राहील.

१) जमानतदाराचे पूर्ण नांव व पत्ता      सही -----------------

--------------------------------

२) जमानतदाराचे पूर्ण नांव व पत्ता      सही ----------------

--------------------------------

लिलावधारकाची सही ----------------

# जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती
# रेतीघाट ई-निवीदा व ई-लिलावाच्या संक्षिप्त अटी व शर्ती

**सन २०२०-२१ करिता <u>दि. ०९.०६.२०२१</u> पर्यंत मुदतीसाठी वाळू / रेती निर्गती संबधीत नवीन धोरण शासन ( महसूल व वन विभाग) निर्णय क्र. गौखनि १०/०२१९/प्र.क्र. ९ /ख-१ दिनांक <u>०३/०९/२०१९</u> अन्वये रेतीघाट ई निविदा व ई - लिलाव (ऑक्शन ) लिलाव धारकासाठी सर्व साधारण अटी आणि शर्ती <u>रेती / वाळू घाटाकरिता ई - निविदा व ई लिलाव (ऑक्शन) पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.</u>**

१. सन २०२०-२१ करिता दिनांक ०९.०६.२०२१ पर्यंत मुदतीसाठी रेतीघाटाचा कालावधी राहील.

२. वाळू गटासाठी निश्चित करण्यात आलेल्या अपसेट प्राईस (हातची किंमती) पेक्षा अधिक किमतीच्या ई-<u>निविदां व ई- लिलाव</u> द्वारे रेतीघाटाची निर्गती करण्यात येईल.

३. ई -निविदाद्वारे व ई- लिलावाद्वारे प्राप्त झालेले देकार हातच्या किंमतीपेक्षा जास्त नसल्यास मा. विभागीय आयुक्तांच्या निर्देशास अनुसरुन त्या वाळू गटाचा १० दिवसाचा आंत फेर ई -निविदा व फेर ई- लिलाव बोलाविण्यात येईल.

४. अटी व शर्ती नुसार ई- निविदा सोबत ई- लिलावात भाग घेण्याऱ्या व्यक्तीला / संस्था/ कंपनीला अनामत रक्कम म्हणून रुपये <u>३,००,०००/- किंवा</u> अपसेट प्राईजच्या <u>२० %</u> रक्कम ( EMD) यापैकी जी जास्त असेल ती रक्कम अनामत म्हणून भरावी लागेल. परंतू ज्या वाळूघाटाची अपसेट प्राईज रुपये १० लाखा पेक्षा कमी असेल तर अपसेट प्राईजच्या २० % अनामत रक्कम म्हणून वर नमुद पध्दतीचा अवलंब करुन ऑन लाईन जमा करावा लागेल. ज्या कंत्राटदाराने ई- निविदा ज्या रेतीघाटासाठी भरली असेल त्या रेतीघाटासाठी ई- लिलाव पध्दतीमध्ये भाग घेता येईल. सदर नमुद आवश्यक कागदपत्रे जोडले / सादर केले नाहीत. अशा कंत्राटदाराची ई- निविदा / ई- लिलाव अवेध ठरविण्यात येईल. आणि ज्या निविदाधारकाची / लिलावधारकाची ई- निविदा / ई- लिलाव वैध ठरविली आहे. त्यांना लिलाव कार्यवाही संपल्यानंतर वरील नमुद कागदपत्राची प्रत त्वरीत सादर करावी लागेल.

५. ई- निविदेद्वारे /ई- लिलाव घ्यावयाच्या रेती / वाळू स्थळात अपेक्षित वाळूसाठा आहे किंवा नाही, आणि रेतीघाटात सध्या पाणी आहे किंवा कसे. तसेच वाहतुकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत ई- निविदा धारकाची /ई- लिलावधारकाची राहील.

६. ई- निविदेतील / ई- लिलावातील सर्वोच्च बोलीचा देकार स्विकारावयाचा किंवा नाकारावयाचा निर्णय मा. जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी घेतील. व तसे संबधितास कळविण्यात येईल.

७. सर्वोच्च ई- निविदा/ ई- लिलाव स्वीकारल्या नंतर व १/४ रक्कम भरल्या नंतर व मंजूरी दिल्यानंतर १५ दिवसांत ई- निविदेतील/ ई- लिलावातील उर्वरित ३/४ रक्कम भरण्यात येईल. अशा हमीचे दायीत्व स्वीकारणाऱ्या दोन व्यक्तीसह ई- निविदा / ई- लिलावधारक स्वखर्चाने खरेदी केलेल्या रुपये १००/- इतक्या रकमेच्या मुद्रांकीत (स्टॅम्प पेपर) कागदावर करारनामा करुन देईल. असे करारपत्र करुन न दिल्यास त्याने

भरलेली १/४ रक्कम जप्त करण्यात येईल व दुसऱ्या ई- निविदा/ ई- लिलाव धारकास प्राधान्य दिला जाईल. तसेच विहित कालावधीत वरील प्रमाणे करारपत्र न केल्याच्या परिणामी संबधीत ई- निविदा / ई- लिलाव धारकास होणाऱ्या कोणत्याही नुकसानीची जबाबदारी शासनावर राहणार नाही. ई- निविदा / ई- लिलाव मधील नमूद रकमेपैकी वरील प्रमाणे भरलेली रक्कम वजा जाता शिल्लक राहीलेली उर्वरीत रक्कम सर्वोच्च ई -निविदा/ ई- लिलाव स्विकारल्यापासून मंजूरी दिल्यानंतर १५ दिवसात एक रकमी भरावी लागेल. ई- निविदा / ई- लिलाव धारकाने उर्वरीत राहीलेली रक्कम भरल्यानंतर व करारपत्र केल्यानंतर, त्याला वाळू स्थळाचा प्रत्यक्षात ताबा उशीरात उशीरा सात दिवसात देण्यात येईल. तसे न केल्यास ई- निविदा / ई- लिलाव बोली जप्त करण्यात येईल. व पुन्हा ई- निविदा व ई- लिलाव करण्यात येईल.

८. शासन निर्णय दिनांक ०३/०९/२०१९ अन्वये वाळूगटाचे लिलाव झाल्यानंतर संबंधीत लिलावधारकाकडून वाळूचे उत्खनन करण्यात येत असल्याने पर्यायाने पर्यावरण अनुमतीतील अटी व शर्तीचे पालन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची असते. त्यामुळे जे वाळू / रेतीगट लिलावात जातील त्यांच्या बाबतीत संबंधीत लिलावधारकाच्या नावे पर्यावरण अनुमती वर्ग करण्यात येईल.

९. रेती / वाळू (ठेका) ई -निविदा / ई- लिलाव ज्यावेळी रद्द करण्यात येईल अशा वेळेस त्या रेती/ वाळू क्षेत्राचा नव्याने ई -निविदा व ई- लिलाव  करण्यात येईल. फेर ई- निविदेत / ई- लिलावात पुर्वीच्या ई- निविदा / ई- लिलाव किंमतीपेक्षा कमी किंमत आल्यास फरकाची रक्कम पुर्वीच्या ई- निविदा / ई- लिलाव धारकाकडून जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल. तथापि फेर ई- निविदेत / ई- लिलावात पुर्वीच्या किंमतीपेक्षा अधिक (जादा) किंमत आल्यास त्यावर पुर्वीच्या ई- निविदा / ई- लिलाव धारकाचा कोणताही हक्क राहणार नाही.

१०. ई- निविदाधारक/ ई- लिलावधारक त्यांच्या ई -निविदा/ ई- लिलाव क्षेत्रातील ज्या ठिकाणातून रेती/ वाळू काढण्याने धूप होऊ शकेल व त्यामुळे निवासी इमारतींना, घरे अथवा इतर बांधकामे यांना धोका निर्माण होईल अशा ठिकाणातून वाळूचे स्वत: उत्खनन करणार नाही. अथवा इतरांना तसे करण्यास परवानगी देणार नाही. अशा प्रकरणी उत्खनन करण्यास प्रतिबंध करणारे जिल्हाधिकारी/ अपर जिल्हाधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील.

११. उत्खनन केलेल्या वाळूच्या/ रेतीच्या वाहतूकीसाठी अस्तित्वात असलेले रस्तेच ई- निविदाधारकाने / ई- लिलावधारकाने वापरावयाचे आहेत. तसेच वाहतुकीसाठी वेगळे रस्ते उपलब्ध करुन दिले जाणार नाहीत. तसेच वाहतुकीसाठी नवीन रस्ता मिळविण्याची जबाबदारी ई-निविदाधारकाची / ई-लिलावधारकाची राहील. रस्ते उपलब्ध नाहीत किंवा वाहतुकीसाठी बंद आहेत या कारणास्तव कोणत्याही परिस्थितीत रेती/वाळू उत्खननाचा कालावधी वाढवून दिला जाणार नाही. अथवा रेती/ वाळूघाट बदलून दिला जाणार नाही.

१२. कोणत्याही रेल्वेच्या पुलाच्या कोणत्याही बाजूने ६०० मीटर्स (२००० फुट) अंतराच्या आत रेतीचे उत्खनन करता येणार नाही. तसेच जेथे नदी- नाल्यांवर पूल आहेत, त्यांच्या स्तंभापासून १०० मीटर्स पर्यंत उत्खनन

करता येणार नाही. परंतू रेतीघाट निहाय सदर बाबीच्या अनुषंगाने स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन अंतर ठरविण्याचे अधिकार जिल्हाधिकारी/ अपर जिल्हाधिकारी यांना असतील.

१३. **रेती उत्खनन व वाहतूक यावर नियंत्रण ठेवण्यासाठी मे. शौर्या सॉफ्टवेअरचा किंवा त्याच प्रकारचे इतर सॉफ्टवेअरचा उपयोग लिलावधारकाकडून करुन घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांचे असतील, आणि त्यासाठी लागणारा खर्च संबधित ठेकेदार यांना सोसावा लागेल.**

१४. जेथे वाळू उत्खनन चालू आहे. त्या ठिकाणी फलक लावून उत्खनन क्षेत्राची सीमा निश्चित करुन दर्शविण्यात यावी.

१५. वाळूचे/रेतीचे उत्खनन करताना किंवा ती काढताना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी/ नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व ई-निविदाधारकावर / ई- लिलावधारकावर राहील. अशा हानीची/ नुकसानीची परिगणना सक्षम अधिकाऱ्याकडून करण्यात येईल व त्या बाबतचा त्याचा निर्णय अंतिम राहील व अशी रक्कम थकीत जमीन महसूलाच्या वसूलीप्रमाणे संबंधीत ई- निविदाधारकाकडून / ई- लिलाव धारकाकडून वसूल करण्यात येईल.

१६. ई निविदेद्वारे/ ई- लिलावाद्वारे दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत शासनाने तो ठेका रद्द केल्यास किंवा त्याला मंजूर केलेल्या क्षेत्राचे उत्खनन करण्यास किंवा रेती/ वाळू काढण्यास बंदी घातल्यास ई- निविदाधारकास / ई- लिलावधारकास शासनावर खटला भरता येणार नाही. परंतु लिलावधारकास कोणत्याही वैध कारणामुळे ग्रामस्थांचा विरोध, न्यायालयीन निर्णय, नैसर्गिक अडीअडचणी, प्रशासकिय यंत्रणांचा विरोध यामुळे उत्खननास किंवा वाहतुकीस बाधा आल्यास किंवा वाळूघाटाचा ताबा न दिल्यास लिलावाची मुदत संपण्यापुर्वी ज्या कालावधीसाठी ठेका रद्द केला जाईल त्या कालावधीसाठी, त्याने ज्या किंमतीला ई -निविदा/ ई- लिलाव घेतला त्या रकमेच्या प्रमाणात त्याला परतावा देण्यात येईल. अशी रक्कम परत करतांना ई- निविदा / ई- लिलाव देकाराची रक्कम अंदाजीत वाळूसाठा व प्रत्यक्ष उत्खनन केलेला वाळूसाठा विचारात घेऊन त्यानुसार परताव्याच्या रकमेची परिगणना करण्यात येईल.

१७. उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळूची/ रेतीची साठवणूक, ई-निविदा / ई-लिलाव ज्या जिल्हाधिकाऱ्याने /अपर जिल्हाधिकाऱ्याने केला असेल त्याच जिल्हयात करावी लागेल व त्यासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी ई -निविदा / ई- लिलाव धारकाची असेल. वाळू / रेती ठेक्याची मुदत संपण्यापूर्वी ज्या वाळू / रेतीचे उत्खनन केलेले आहे. त्या वाळूचा/रेतीचा साठा मुदत संपल्यानंतर १० दिवसात उत्खननाच्या जागेवरुन हलविण्यात आला नाही तर तो शासनाच्या मालकीचा होईल. व अशा वाळूच्या / रेतीच्या किंमतीबाबत अथवा मालकीबाबत ई-निविदाधारकास / ई- लिलावधारकास अथवा त्यांच्या ठेकेदारास कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासनविरुध्द दावा करता येणार नाही. तसेच लिलावाचा कालावधी संपल्यानंतर तसेच १० दिवसाची मुदत

संपल्यानंतर कोणत्याही परिस्थित वाळू / रेतीसाठा करण्यास परवानगी देता येणार नाही. किंवा त्याचा वाहतुकीसाठी दुय्यम पासेस देता येणार नाही.

१८. ई-निविदाधारकास / ई- लिलावधारकास वाळूची/ रेतीची वाहतूक करण्यासाठी परवाना द्यावयाचा असल्यास त्याने स्थानिक शासकिय कामे व सहकारी संस्था/संस्थांना प्राधान्य दिले पाहिजे.

१९. ई- निविदाधारकाने / ई- लिलावधारकाने जिल्हा परिषद कर/पंचायत कर विहित केल्याप्रमाणे अदा करण्यात यावा.

२०. ई- निविदाधारकाने /ई- लिलावधारकाने त्याला वाटप केलेल्या/मंजूर केलेल्या क्षेत्राच्या सीमा दर्शविणारे खांब उभारावे. तसेच सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीने नेमलेल्या त्याच्या उपठेकेदाराचे नांव, पत्ता व जागेचा तपशिल दर्शविणारा फलक योग्य ठिकाणी लावणे आवश्यक आहे. व त्याशिवाय उत्खनन सुरु करता येणार नाही.

२१. ई -निविदा /ई- लिलाव घेण्याची तारीख काहीही असली तरी ई -निविदा / ई- लिलाव दिनांक ०९/०६/२०२१ रोजीच संपुष्टात येईल. ई -निविदेद्वारे / ई- लिलावद्वारे दिलेल्या क्षेत्रातून करारात नमूद केलेल्या कालावधीत, परवानगी दिलेल्या साधनाच्या सहाय्यानेच वाळूचे/रेतीचे उत्खनन करण्याची जबाबदारी ई-निविदाधारकाची / ई- लिलावधारकाची राहील. वाळू स्थळात अपेक्षित साठा नाही, रस्ते उपलब्ध नाहीत, वाळू स्थळात पाणी आहे अशा तसेच मानवी वा नैसर्गिक आपत्तीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही व वाळूगट बदलून दिला जाणार नाही.

२२. एकदा अत्युच्च बोली स्विकारून अंतीम करण्यात आलेल्या लिलावात कोणत्याही परिस्थीतीत रेती/वाळु उत्खननाचा कालावधी वाढवुन देण्याचा अथवा कोणत्याही कारणास्त व रेतीचा/ वाळुचा गट बदलुन देण्याची मागणी लिलाव धारकासा करता येणार नाही. उत्खनन केलेल्या वाळूच्या / रेतीच्या वाहतुकीसाठी अस्तित्वात असेलेले रस्तेच ई- निविदा धारकाने /ई- लिलावधारकांने वापरावयाचे आहेत. तसेच वाहतुकीसाठी वेगळे रस्ते उपलब्ध करुन दिले जाणार नाहीत. तसेच वाहतुकीसाठी नवीन रस्ता मिळविण्याची जबाबदारी ई- निविदाधारकाची / ई- लिलावधारकाची राहील. रस्ते उपलब्ध नाहीत किंवा वाहतुकीसाठी बंद आहेत. या करणास्तव कोणत्याही परिस्थीत रेती / वाळू उत्खननाचा कालावधी वाढवून दिला जाणार नाही अथवा रेती / वाळूघाट बदलवून दिला जाणार नाही.

२३. नदीपात्रातून/नाल्यातून अथवा त्याला रेती/ वाळू उत्खनन करण्यासाठी ज्या क्षेत्राचे वाटप केले असेल त्या क्षेत्रातून रेती/वाळू उत्खनन करताना नैसर्गिक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची सर्व खबरदारी ई- निविदाधारकाने / ई- लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

२४.रेतीचे/ वाळूचे नदीपात्रातून/ नाल्यातून भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने सर्वेक्षणानंतर विहित केलेल्या खोलीपेक्षा जास्त उत्खनन करण्यात येऊ नये. तसेच नदीपात्र/नाला यांचे पात्र बदलून अथवा त्यांना हानी पोहोचवून पर्यावरणाचे नुकसान होणार नाही. याचीही खबरदारी ई- निविदाधारकाने / ई- लिलावधारकाने

घ्यावयाची आहे. भूजल सर्व्हेक्षण शुल्क रु. ५०००/- चा डि.डि. उपसंचालक, भूजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा , नागपूर यांचे नावाने जमा करावा लागेल.

२५. ई- निविदाधारकास / ई- लिलावधारकास गावकऱ्यांच्या निस्तार हक्कांस बाधा पोहोचविता येणार नाही .

२६. रेती/ वाळू उत्खनन करताना अथवा हलविताना अपघात झाल्यास ई-निविदाधारकाने / ई- लिलावधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात द्यावी.

**२७. जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत वेळोवेळी विकसीत केलेल्या रेती उत्खनन व वाहतुक प्रणालीबाबतचा वापर करणे अनिवार्य राहील.**

२८. सदर प्रणालीनुसार लिलावधारकास त्याचे ३ मोबाईल नं. रजिस्टर करणे बंधनकारक राहील.

२९. वाळू / रेती वाहतुक करणाऱ्या चालकाकडे वाहतुक परवाना नसेल किंवा वाहतुक परवानाचा कालावधी संपलेला असेल तर अशी वाहतुक अवैध ठरेल.

३०. वाळू/रेतीची वाहतुक करणाऱ्या वाहन चालकाकडे वाहतुक परवाना आहे किंवा नाही. याबाबतचे निरीक्षण संबधीत महसुल यंत्रणेकडून , नियुक्त भरारीपथकाकडून अथवा जिल्हाधिकारी नामनिर्देश करतील अशा व्यक्ती कडून केले जाईल. अशा निरीक्षणाचा वेळी संबंधीत वाहन चालकाकडे वाहतुक परवाना आढळला नाही किंवा निर्दीष्ट कालावधी संपलेला असेल तर सदर वाळूचे उत्खनन / वाहतुक अवैध समजून त्याविरुध्द महराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ मधील कलम ४८ (७) व (८) , महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन ( विकास व विनियमन) नियम २०१३ आणि संदर्भाधीन दिनांक ०३/०९/२०१९ च्या शासन निर्णयातील तरतुदी नुसार त्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

३१. वाळू/रेती लिलावधारकाने वाहतुक परवानामध्ये प्रणालीस कळविलेल्या परिमाणा पेक्षा अधिक परिमाणाची रेती / वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण गौण खनिज अवैध आहे. असे समजून त्यावर नियमानुसार दंडात्मक कार्यवाही तसेच क्षमते पेक्षा जास्त वाहतुकीबाबत मोटार वाहन कायदयानुसार कारवाई करण्यात येईल. दंडनिय कारवाई बरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात येईल. त्याच प्रमाणे लिलावधारकाने रेती / वाळूचे उत्खनन , विक्री व वाहतुक केलेल्या रेतीबाबतची दैनंदिन हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरिक्षक, महसूल अधिकारी तसेच जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरिक्षण करणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन द्यावीत.

३२. गौण खनिजाच्या उत्खननाचे, विक्रीचे व वाहतूकीच्या संबंधातील सर्व हिशोब व कागदपत्रे, लिलावाने/परवाने दिलेल्या जागेवर ठेवली पाहिजे. आणि सदरहू हिशोब व कागदपत्रे संबंधित महसूल अधिकारी, खनिकर्म अधिकारी तसेच भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यांच्या आणि जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांच्या निरिक्षणाकरिता प्रत्येक आठवडा व महिन्याला जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचा कार्यालयात उपलब्ध करुन द्यावीत.

३३. ई- निविदाधारकाने / ई- लिलावधारकाने करारनामा करतेवेळी ई- निविदा / ई- लिलाव अटी व शर्तीचे यथोचित पालनार्थ रक्कम रु. ३,००,०००/- (रुपये तीन लाख फक्त) किंवा अपसेट प्राईसच्या २० % यापैकी अधिक असेल तेवढी रक्कम अनामत रक्कम जमा करावी लागेल. परंतू ज्या वाळूघाटाची अपसेट किंमत रु. १० लाखा पेक्षा कमी असेल तर रु. ३,००,०००/- अनामत म्हणून विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे ठेवावी लागेल. ही रक्कम निविदाधारकाने / लिलावधारकाने ई -निविदेच्या/ ई- लिलावाच्या मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्यरित्या पालन केल्यास, ई -निविदेची / ई- लिलावाची मुदत संपल्यावर परत करण्यात येईल. अटी व शर्तीचे लिलावधारकाने पालन न केल्यास अनामत रक्कम अंशत: अथवा पुर्णत: जप्त करण्यात येईल.

३४. निविदाधारकाने / लिलावधारकाने नियमात नमुद केल्याप्रमाणे अटी व शर्तीचे तसेच गौण खनिज उत्खनन नियमातील तरतूदी नुसार असलेले नियम ( संबंधीत विभागास लागू असलेले नियम) आणि तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतूदी नुसार लागू असलेल्या नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेतीचा/वाळूचा पूर्ण उपयोग गौण खनिज म्हणूनच केला पाहिजे.

३५. ई- निविदाधारक /ई-परवानाधारक यांना <u>पर्यावरण विषयक व तटीय विनियमन</u> नियमाच्या तरतूदीचे पालन करणे बंधनकारक आहे.

३६. कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे असलेल्या ठिकाणी पाटबंधारे विभाग/ विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या अंतराच्या मर्यादेचे बंधन पाळणे आवश्यक असेल.

३७. सार्वजनिक पाणवठा/ पाणी पुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासून १०० मिटर अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा निश्चित करेल तेवढया अंतरापलिकडे उत्खनन करणे आवश्यक आहे.

३८. वाळूची वाहतूक करतांना वाहनातील वाळू प्लास्टीक पेपरने / ताडपत्रीने आच्छादित करुनच वाळूची वाहतूक करणे बंधनकारक आहे. अशी वाहतुक न केल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

३९. अंदाजित परिमाणापेक्षा अधिक वाळूसाठा रेतीगटात असल्यास त्यावर निविदाधारकाचा/ लिलावधारकाचा कोणताही अधिकार राहणार नाही व अंदाजित परिमाणापेक्षा अधिक उत्खनन करण्यास निविदाधारकास/ लिलावधारकास परवानगी देता येणार नाही.

४०. अवैध वाळू/ रेती साठा पकडल्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील ४८ (७) व (८) व प्रचलित शासन निर्णया नुसार कारवाई करण्यात येईल.

४१. पर्यावरणाचे संतूलन राखणेसाठी निकामी वाळूचे साचलेले ढिग नदीपात्रातील वाळू उपसल्यामुळे झालेले खड्डे बुजविण्यासाठीउपयोगात आणावे. त्याची जबाबदारी निविदाधारकाची / लिलावधारकाची राहील.तसेच लिलावधारकाने पर्यावरण विभागाचे सर्व नियम पालन करणे बंधनकारक राहील.

४२. लिलावधारकाने १/४ रक्कम जमा केल्यानंतर आणि बोलीप्रमाणे ३/४ रक्कम लिलावधारकाने जमा केल्यानंतर तसेच विहीत मुद्रांक शुल्क, सुरक्षा ठेव, पर्यावरण शुल्क, आयकर शुल्क, व्हॅट रक्कम , पर्यावरण

अटीचे पालनार्थ २ % सर्वोच्च बोलीच्या बँक गॅरंटी , मोजणी नकाशा जमा करुन व करारनामा केल्यानंतर लिलावधारकास रेतीघाटाचा ताबा देण्यात येईल.

४३.रेती / वाळू घाटाकरिता फक्त ई -निविदा व ई- लिलाव ( ऑक्शन) पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. ज्यां निविदाधारकांनी दिलेल्या संकेतस्थळावर ई -निविदा भरल्या नाहीत अशा निविदाधारकांच्या निविदा अवैध ठरविण्यात येतील. व त्यांना कार्यालयात दाद मागण्याचा अधिकार राहणार नाही.

४४. ई- निविदा व ई- लिलाव मध्ये भाग घेण्यासाठी कंत्राटदारास वेबसाईडवर नोंदणीसाठी (Registration) नियमित आयकर भरत असल्याच्या पुरावासह मागिल दोन वर्षाचे भरणा केलेले आयकर विवरण ,पॅन क्रमांक , प्रतिज्ञापत्र व विक्रीकर विभागाच्या टिन ( TIN) क्रमांक, कंपनी/ फार्म असल्यास रजिस्ट्रेशनची प्रत सादर करणे अनिवार्य आहे.

४५. लिलावाच्या निविदा भरु इच्छिणाऱ्या व्यक्ती / संस्था यांना निविदा अर्जाचे शुल्क वाळूगटाची हातची किंमत रु. १०.०० लाखापेक्षा कमी असल्यास रु. २०००/- व रु. १०.०० लाखापेक्षा जास्त असल्यास रु. ५०००/- संबंधित जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्याचा नावाने धनादेशाद्वारे भरावी लागेल.

४६. ज्या व्यक्तींची /संस्था/ कंपनीची सर्वोच्च ई- निविदा व ई- लिलाव बोली असेल त्या बोलीच्या १/४ रक्कम ई- निविदा व ई- लिलाव धारकांने आधी जमा केलेली अनामत रक्कम (EMD) वजा जाता उर्वरीत रक्कम त्वरीत जमा करणे बंधनकारक राहील. अन्यथा सदर रेतीघाटाचा ई- निविदा व ई- लिलाव रद्द करण्यात येईल. व जमा रक्कम जप्त करण्यात येईल.

४७. विहित केलेल्या मर्यादेच्या पलिकडे असलेल्या क्षेत्रातून रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही. तसेच इतर व्यक्तीच्या खाजगी मालकीच्या जमिनीतून, अशा जमिनी लिलावाने देण्यात आलेल्या क्षेत्रात समाविष्ट असल्या तरी, रेती/ वाळू काढता येणार नाही तसेच रस्ते / पायवाट म्हणून वापरण्यात येणाऱ्या जमिनीतून रेती/ वाळू काढता येणार नाही.

४८.रेतीचे/वाळूचे उत्खनन करतेवेळी जर काही प्रमुख खनिज आढळून आल्यास निविदाधारकाने/ लिलावधारकोन/ ठेकेदाराने विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे सात दिवसात कळविले पाहिजे.

४९.दर महिन्याचे **दुसऱ्या व चौथा रविवार रोजी मंजुर** केलेल्या रेतीघाटातून मा. उच्च न्यायालय यांनी रिट पिटीशन क्र.४८३०/२०१० या प्रकरणा मध्ये देण्यात आलेल्या निर्णयान्वये रेती उपसा करण्याचे काम बंद ठेवावे लागेल.

५०. रेती/वाळू उत्खननाची वेळ **सकाळी ६.०० ते संध्याकाळी ६.०० वाजे** पर्यंतच राहील. सदर कालावधी नंतर उत्खनन आढळल्यास अवैध समजण्यात येईल. कुठल्याही वाहनाला सुर्यास्तानंतर संबंधित रेतीघाटामधून वाहनामध्ये रेती भरता येणार नाही. तसेच कुठलेही वाहन / यांत्रिक साधन ( जेसीबी, पोकलॅन

इत्यादी ) रेतीघाटामध्ये ठेवता येणार नाही. तसे आढळून आल्यास अवैध उत्खनन व वाहतुक म्हणून समजण्यात येईल व नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

५१. निविदाधारकास / लिलावधारकास वाळू / रेतीगटाचा स्वामित्वधनावरील मुल्यांचा २% रक्कम पर्यावरण शुल्क म्हणून ताबा घेणे पुर्वी शासनास जमा करावी लागेल.

५२. आयकर (TCS / TDS २%) व आवश्यक असलेले मुद्रांक शुल्क रक्कम शासन जमा करारनामा करण्याची जबाबदारी निविदाधारकाची / लिलावधारकाची राहील.

५३. महाराष्ट्र शासनाकडून रेतीघाट लिलावाद्वारे प्राप्त स्वामीत्वधनावर वस्तु व सेवा कर (GST) अंतर्गत लागू असलेले कर लिलावधारकाडून वसुल करण्यात येईल, या अटीवर रेतीघाट करारनामा करण्यात येईल.

५४. मंजुर केलेल्या रेतीघाटाचे स्व: खर्चाचे मोजणी व सिमांकण केलेला नकाशाचे दोन प्रती सादर करुन करारनामा करण्याची जबाबदारी निविदाधारकाची/ लिलावधारकाची राहील. त्यानुसार मोजणी नकाशातील क्षेत्रावर निविदाधारकाचा / लिलावधारकाचा ताबा राहील.

५५. वाळू उत्खनन व वाहतुक वाहनाची यादी वाळू उपसा पूर्वी जिल्हा व तहसिल कार्यालयास सादर करावी लागेल.

५६. लिलावधारकाने निविदा अधिसुचना सर्वसाधारण निर्देश, विशेष निर्देश यातील अटी, शर्ती पालन केल्यानंतर लिलावधारकाशी विहित करारनामा करुन घेतल्या नंतर पात्र लिलावधारकास वाळू गटाचा ताबा देण्यात येईल.

५७. दिलेल्या ठेक्याचे व उत्खनन परवान्याचे जनहितास्तव कोणतेही कारण न देता निलंबन करणे, रद्द करणे अथवा माघार घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी यांना असतील.

५८. शासन वेळोवेळी जे निर्देश देईल त्याचे पालन करणे लिलावधारकास बंधनकारक राहील.

५९. ई- निविदा / ई- लिलाव स्विकारणे अथवा नाकारने किंवा तांत्रिक अडथळा निर्माण झाल्यास सदर कार्यवाही पुढे ठेवणे संबंधिचा तसेच शासनास आवश्यकता भासल्यास रेतीघाट रद्द करण्याचे अधिकार मा. जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांनी राखून ठेवला आहे.

६०. महाराष्ट्र शासनाने अधिसुचना MDF ०६१५/CR.३४/Ind-९ दिनांक ०१/०९/२०१६ अन्वये सर्वोच्च बोली बोलणाऱ्या लिलावधारकास लिलावाचा रक्कमेचे १०% रक्कम जिल्हा खनिज प्रतिष्ठान अमरावती यांचे नावे जमा करण्यात येईल.

६१. रेतीघाटधारकाने रेतीघाट व रेतीसाठवणुकीचा ठिकाणी स्वखर्चाने CCTV Camera लावणे अनिवार्य राहील. सदर Camera Weekly recording तहसील कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालय येथे उपलब्ध करण्यात यावे व त्याची पोचपावती संबंधीत लिलावधारकाने जतन करुन ठेवावे अन्यथा Invoice generate होणार नाही.

६२. लिलावधारकाने रेती साठवणुक करीता जागा उपलब्ध करावयाची जबाबदारी त्याची स्वत:ची राहील व रेतीसाठवणूकीची जागा अकृषक करण्याची जबाबदारी त्याची स्वत:ची राहील. अकृषक जागेवर साठवणूक करण्याबाबतची माहिती साठवणूकीपुर्वी जिल्हाधिकारी कार्यालयाची परवानगी लिलावधारकानी घ्यावी.

अशा साठवणूकीचा ठिकाणी लिलावधारकाचे प्रतिनीधी आवश्यक दस्तावेजसह २४ x ७ हजर राहतील याची सर्वस्वी जबाबदारी रेतीघाटधारकाची राहील.

६३. लिलावधारक सर्व रेती वाहतुक करणाऱ्या वाहनाची नोंद घेवुन त्याबाबतची माहिती तहसिल कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावी तसेच सर्व रेती वाहतुक करणाऱ्या वाहनांना GPS लावणे व GPS कार्यान्वीत ठेवणे अनिवार्य राहील.

६४. अतिभार वाहतुक करणाऱ्या वाहतुकधारक सोबतच, ज्या रेतीघाटधारकाने वाहनात अतिभार रेती भरण्यास परवानगी दिली, त्या रेतीघाटधारक व संबंधीत वाहतुकदार या दोन्हीवर कार्यवाही करण्यात येईल.

६५. राज्यस्तरीय पर्यावरण अनुमती समितीने रेतीघाटाकरिता पर्यावरण अनुमती देतांना Environment Management Plan लागू केलेला असुन त्यानुसार निर्धारित केलेल्या रकमेनुसार स्वखर्चाने Environment Management Plan राबविणे बंधनकारक राहील.

६६. रेतीघाटाचा ताबा घेतांना लिलावधारकाने स्वखर्चाने भूमी अभिलेख विभागाकडून ETS मोजणी करुन घ्यावी व त्यासंबंधीचा अहवाल तहसिल कार्यालयास सादर करावा. मोजणी प्रमाणे सिमांकन करुन घेवून तदनंतरच रेती/वाळूचा उपसा करता येईल.

६७. Project Proponent म्हणून प्रकरणपरत्वे राज्यस्तरीय समितीसमोर पर्यावरण अनुमतीचे प्रस्ताव सादर करणाऱ्या अधीकाऱ्याच्या नावाने पर्यावरण अनुमती प्राप्त झाली आहे. वाळूगटाचे लिलाव झाल्यानंतर संबंधीत लिलावधारकाकडून वाळूचे उत्खनन करण्यात येत असल्याने, लिलावधारकाकडून वाळूचे उत्खनन करण्यात येत असल्याने, लीलावधारक हा Project Proponent असुन सर्वोच्च बोली स्वीकारल्यानंतर संबंधीत लिलावधारक /निवीदाधारकाचे नावे पर्यावरण अनुमती वर्ग करण्याचा प्रस्ताव Project Proponent म्हणून पर्यावरण अनुमतीचे प्रस्ताव सादर करणाऱ्या अधीकाऱ्यांनी प्रकरणपरत्वे राज्यस्तरीय पर्यावरण परीणाम व्यवस्थापन प्राधीकरणासमोर सादर करण्यात येईल. पर्यायाने पर्यावरण अनुमतीतील अटी व शर्तीचे पालन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील.

६८. **Under no circumstance mechanical mining either by JCB/Poclain or any other machine devices etc. by any name shall be adopted . Mining only done by manual methods.**

६९. Excavation shall be carried out in such way that minimum २m of sand is left on the river bed after mining.

७०. Under water, mining shall not be carried out, in any circumstances.

७१. No mining shall be carried out within २००m distance of Riverine Structures.

७२. The instructions of Government conveyed in the GR dated ३/०९/२०११ should be followed, as modified from time to time.

**Specific conditions :-**

१. Proposals are recommended for Environmental Clearance for period २०२०-२०२१ only.

२. Provisions stipulated in Maharashtra Minor Minerals Extraction ( Development and Regulation) Rules २०१३ and Government Resolution of Revenue and Forest Department dated ०३/०९/२०१९.

३. Lessee will be held responsible individually for non compliance of the conditions stipulated in the Environment clearance and shall be liable for legal action under Environment ( Protection) Act of १९८६.

४. Lessee shall pay bank guarantee upto २% of the total auction cost for the given auction period from project proponent to ensure the compliance of the conditions stipulated. In case of violation of stipulated conditions by project proponent bank guarantee so obtained shall be forfeited and legal action under the law should be initiated against such project proponent.

५. Depth of mining is upto ३ meters or water level whichever is less or as recommended by GSDA.

६. It shall be ensured that excavation of minor mineral does not disturb or change the underlying soil characteristics of the river bed / basin, where mining is carried out.

७. It shall be ensured that mining does not in any way disturb the turbidity, velocity and flow pattern of the river water.

८. It shall be ensured that there is no fauna dependant on the river bed or areas closed to mining for its nesting.

९. Turtle nesting units' conservation is very important. Therefore sand mining in such areas is to be prohibited.

१०. The green belt development /tree plantation will be made in an area of २०% of the total leased area either on river bank or along side.

११. Measures for prevention & control of soil erosion and management of silt shall be Undertaken. Protection of dumps against erosion, if any, shall be carried -out with geo textile matting or other suitable material.

१२. Lessee to ensure that there is no violation of the Supreme Court order and orders of the National Green Tribunal given in the related matters.

**General Conditions :-**

१. Precise mining area will be jointly demarcated at site by officials of Mining/Revenue Department and lessee prior to mining operations for all proposals under consideration. Such site plan, duly verified by competent authority shall be submitted to Environment Department.

२. All necessary statutory clearances shall be obtained before start of mining operations.

३. No mining shall be carried out in the safety zone of any bridge and /or embankment.

४. No mining shall be carried out in the vicinity of natural/ manmade archaeological sites.

५. Waste water, if any, shall be properly collected and treated so as to conform to the standards prescribed by MOEF/CPCB.

६. No wildlife habitat will be infringed.

७. Environmental clearance is subject to obtaining clearance under the Wildlife (Protection) Act,१९७२ from the competent authority, if applicable to this project.

८. Green belt development shall be carried out considering CPCB guidelines including selection of plant species and in consultation with the local DFO/Horticulture Officer.

९. Parking of vehicles should not be made on public places.

१०. Transportation of materials shall be done by covering the trucks/ tractors with tarpaulin or other suitable mechanism so that no spillage of mineral/dust takes place.

११. Appropriate mitigation measures shall be taken to prevent any kind of pollution in consultation with the Maharashtra Pollution Control Board. It shall be ensured that there is no leakage of oil and grease from the vehicles used for transportation.

१२. Vehicular emissions shall be kept under control and regularly monitored. The mineral transportation shall be carried out through the covered trucks only and the vehicles carrying the mineral shall not be overloaded.

१३. Special Measures shall be adopted to prevent the nearby settlements from the impacts of mining activities. Maintenance of roads through which transportation of minor minerals is to be undertaken, shall be carried-out regularly.

१४. Dispensary facilities for first-aid shall be provided at site.

१५. Occupational health surveillance program of the workers should be undertaken periodically.

१६. Measures shall be taken for control of noise level to the limits prescribed by CPCB.

१७. Any change in mining area, khasra/ Gat numbers, entailing capacity addition with change in process and or mining technology, modernization and scope of working shall again require prior Environmental Clearance as per provisions of EIA Notification ,२००६ ( as amended ).

१८. Highest bidder will arrange the mobile toilets to the workers working in the area and sewage generated shall be property collected and treated so as to confirm to the standard prescribed by MOEF & CC and CPCB.

" प्रारुप "

अपर जिल्हाधिकारी, अमरावती

# AGREEMENT OF ANNUAL QUARRY LEASE FOR SAND

( DISPOSAL OF SAND BLOCKS BY e- TENDER/ e-AUCTION OF SAND U/R 68 MAHARSHTRA MINOR MINERAL EXTRACTION ( Development and Regulation) RULES 2013 & GUIDELINES ISSUED VIDE G.R.No. गौखनी-10/512प्र.क्र.-300/ ख. 03/09/2019. ( Year 2020-21 upto the period 30/09/2021).

This Indenture Made This ----------- Day Of -------------- Between The Collector/ Addl. Collector Of Amravati (Here In After Called The "Lessor") which expression shall where the context so admits s\be deemed to include his successors in office and assigns of one part and. ------------------------------------------------------------------ (here in after referred to as "the lessee" which expression shall where the context so admits be deemed to include his heirs, executors administrators, representatives and permitted assigns) on the other part. Where as the lessee has bided highest in the e-Tender opened on ------------- & e-Auction held on -------------for recorded sand block described in the schedule here in after written as "SAND QUARRY" and whereas the lessor. As communication his approval to grant of this lease vide order ------------------------------------ for the period upto **09.06.2021** in consideration of the payment of Rs. ---------/- { in word **Rs.** ------------------------------------------------------- } being the amount of the highest bid EMD of upset price deposited online Rs. ------ /- dated ---------, & difference amount of 25% amount of Rs. --------------- Deposited online wide receipt **No. ABC** -------- **Dated** ---- & remaning amount of **Rs.** ------------/- deposited online vide receipt No **ABC** -------- dtd. ------------- & also subsequently **Rs.** ----------/- ( **Rupees** ---------------------------------------------------- ) as security deposited vide chalan no ------ /nsc **dated** ------------ Bank guarantee **Rs.** ------------ **/- dtd.** -------- In witness where of these present have been executed in manner here under appearing the day and first above written.

Delineated on the demarcated plan here to annexed and there on colored here in after referred to as "SAND QUARRY"

The lessor and the lessee is hereby mutually agreed to abide by the terms and conditions set forth below viz.

**SCHEDULE**

**( The Area of the Sand Block )**

| District | Tahsil | Village | Village Panchyat | Name Sand Block | Kh.No.Adjectent Kh.No. | Name of Nalla/ River | Area in Acres / Hectors | Sand quantity in Brass |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | |
| Amravati | | | | | | | | |

**SUBJECT TO THE TERMS AND CONDITIONS SET FORTH BELOW AS UNDER:**